## नाशिक औ.वि. केंद्र येथे तिळगुळ व हळदीकुंकू कार्यक्रम संपन्न



सौ.वंदना चव्हाण उपस्थित भगिनींशी संवाद साधताना

नाशिक औ.वि. केंद्र, एकलहरे येथे नाशिक औष्णिक वीज केंद्र सहकारी पतसंस्थेतर्फे तिळगुळ व हळदीकुंकू कार्यक्रम संस्थेच्या अध्यक्षा सौ.वंदना चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. प्रमुख पाहुण्या म्हणून वर्कर्स फेडरेशनच्या महिला प्रतिनिधी सौ.ज्योति नटराजन, सौ.शारदा गायकवाड, सौ.अलका कुलकर्णी यांनी कार्यक्रमाच्या निमित्ताने हितगुज केले. हळदीकुंकवाच्या निमित्ताने महिला कर्मचाऱ्यांनी सुसंवाद साधला. महिला अध्यक्षा सौ.वंदना चव्हाण यांनी नविन स्तुत्य उपक्रम राबविला. कार्यक्रमासाठी नाशिक औ.वि. केंद्रातील तसेच नासिक व नासिकरोड पारेषण कंपनीतील महिला कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होत्या. सुत्रसंचालन सौ.गोरे यांनी केले. सौ.वंदना चव्हाण यांचे अध्यक्षीय भाषण झाले. संस्थेच्या विद्यमान संचालिका श्रीमती सुरेखा दुसाने, ग्राहकसंस्थेच्या संचालिका श्रीमती मुक्ताबाई जाधव व पुष्पा आहेर तसेच विद्यमान सर्व संचालकांच्या सौभाग्यवतींनी कार्यक्रमाला हजर राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. संस्थेचे उपाध्यक्ष श्री.मोहन हरणे, कार्याध्यक्ष श्री.प्रदीप भुसे तसेच संचालक, कर्मचारी वर्ग व कामगार यांच्या सहकार्याने कार्यक्रम व्यवस्थित पार पडला.

## २५० मे.वॉ. पारस संच क्र. २ ची हायड्रॉलिक चाचणी यशस्वी




पारस प्रकल्पाच्या २५० मे.वॅ. च्या संच क्र. २ चे काम प्रगतीपथावर आहे. दिनांक १८ फेब्रुवारीला बॉयलरची हायड्रॉलिक चांचणी यशस्वी झाली. मानकानुसार २७४ दाबावर ही चाचणी श्री.सुरेश नारखेडे-कार्यकारी संचालक (प्रकल्प-२) कोराडी यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. त्यांचे समवेत मुख्य महाव्यवस्थापक (स्थापत्य-२) कोराडी श्री.गजानन तुळणकर प्रकल्प महाव्यवस्थापक-श्री.अनिल नंदनवार महाव्यवस्थापक संचलन-श्री.अशोक जोहरी, महाव्यवस्थापक स्थापत्य-श्री.प्रमोद नाफडे, अधीक्षक अभियंते सर्वश्री.सिद्धार्थ तारे (प्रकल्प) श्री.विनोद वैद्य (कोराडी), श्री.चिरूटकर (संचलन), श्री.साखरे (संचलन) तसेच मे.भेलचे कन्स्ट्रक्शन मॅनेजर श्री.भारशंकर, श्री.सदगोपन, श्री.मंडल, मे.सुनिल हायटेकचे श्री.प्रसाद व श्री.बेरा इतर अधिकारी आणि कामगार बहुसंख्येने उपस्थित होते. संचालक (प्रकल्प) श्री.विनय बापट यांचे मार्गदर्शनाखाली बॉयलर हायड्रॉलिक चांचणी यशस्वी झाल्याबद्दल कार्यकारी संचालक (प्रकल्प-२) श्री.सुरेश नारखेडे यांनी प्रकल्प महाव्यवस्थापक श्री.अनिल नंदनवार यांचे व त्यांच्या सहकाऱ्यांचे तसेच मे.भेलच्या सर्व अभियंत्यांचे अभिनंदन केले आणि बॉयलर लाईट अपच्या पुढील टप्प्यासाठी शुभेच्छाही दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी कामगारांच्या आग्रहास्तव कार्यकारी अभियंता रमेश थोरात यांनी ''मैं हूँ यमराज'' हे सुरक्षितता पथनाट्य सादर करून सर्वांना हसवले.

## कोराडी वीज केंद्रात वैद्यकीय तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद





भारतीय कारखाने कायदा अधिनियम १९४८ नुसार कारखान्यात काम करणाऱ्या मनुष्यबळाच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांकरिता उपाययोजना म्हणून वर्षातून दोन वेळा आरोग्य चांचणी घेण्याची तरतूद आहे. या अनुषंगाने कोराडी वीज केंद्रात फेब्रुवारी आणि सप्टेंबर २००९ अशा दोन भागांमध्ये वैद्यकीय तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. तपासणी शिबिराचा पहिला भाग २३ फेब्रुवारी ते १४ मार्च दरम्यान घेण्यात येत असून नुकतेच या तपासणी शिबिराचे उद्‌घाटन कोराडी वीज केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक श्री.लक्ष्मीकांत कडाव यांचे हस्ते झाले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून महाव्यवस्थापक सर्व श्री.अनिल भावसार, आर.आर.कुळकर्णी, प्रभारी महाव्यवस्थापक-तडैय्या, अधीक्षक अभियंता सर्वश्री.श्रीमराव शिवणकर, एन.एन. बिघाने, एम.एम. देशमुख, आस्थापना अधिकारी-आनंद कोंत प्रामुख्याने उपस्थित होते.

कोराडी वीज केंद्राचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.विजय बंजारी यांच्या समन्वयातून देवतळे डायग्नोस्टिक सेंटर, नागपूर येथील तज्ञ डॉ. दीपक देवतळे आणि त्यांच्या चमूला पाचारण करण्यात आले असून या माध्यमातून कोराडी वीज केंद्रातील २१५० अधिकारी, अभियंते, तंत्रज्ञ आणि कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने ई.सी.जी., रक्तसाख्वार तपासणी, फुफ्फुस कार्य तपासणी, बहिरेपणा तपासणी तथा सर्व साधारण आरोग्याची तपासणी करण्यात येणार असून हा तपासणी खर्च कोराडी वीज केंद्र करीत आहे. तपासणीनंतर प्रत्येक कर्मचाऱ्याला हेल्थ कार्ड देण्यात येणार आहे हे विशेष.

साधारणपणे २० दिवस चालणाऱ्या या आरोग्य तपासणी शिबिराच्या यशस्वीतेसाठी कोराडी वीज केंद्र दवाखाना अधिकारी तसेच कर्मचारीवृंद अतिशय परिश्रम घेत आहेत.